ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 09 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## एकाच क्षेपणास्त्राने शत्रूचे अनेक तळ उद्ध्वस्त होणार





पान 2 वरुन...

'हरित हायड्रोजन' क्षेत्रातील अग्रदूत, डॉ. रवी पंडित

### राज्यपालांची मंजुरी; विजय जोसेफ यांचा आज शपथविधी

# तामिळनाडूत 'थलापती' पर्व!






**महाईन्यूज । चेन्नई**

तमिळनाडूमधील सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. टीव्हीकेचे विजय जोसेफ यांना १२० आमदारांचं पाठबळ मिळालं असून त्यांनी राज्यपालांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला आहे. दरम्यान, उद्या सकाळी १० वाजण्याच्या सुमारास चेन्नईतील नेहरू स्टेडिअम येथे ते मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. या शपथविधीला लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हेही उपस्थित राहणार आहेत.

५९ वर्षांनंतर विजय हे तमिळनाडूचे पहिले बिगर-द्रविडी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. मात्र, त्यांच्यासोबत मंत्रिमंडळात किती मंत्र्यांचा समावेश केला जाईल, याबाबत अद्याप अनिश्चितता आहे. सरकार स्थापनेचे निमंत्रण मिळवण्यासाठी गेल्या एका आठवड्यात विजय यांची राज्यपालांसोबतची ही चौथी भेट होती. यापूर्वीचे त्यांचे दोन प्रयत्न आमदारांच्या पाठिंब्याअभावी यशस्वी झाले नव्हते.

तमिळनाडूमध्ये आज शपथविधी होणार होता. मात्र, विजय जोसेफ यांच्याकडे सत्तास्थापनेकरता पुरेसे पाठबळ नसल्याने आजचा कार्यक्रम रद्द झाला. आज दिवसभर टीव्हीकेची पाठबळ मिळवण्याकरता धडपड सुरू होती. या घडामोडींनंतर टीव्हीकेच्या कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी चेन्नईतील पक्षाच्या मुख्यालयाबाहेर फटाके फोडून जल्लोष केला.

दुसरीकडे, एनडीएचा मित्रपक्ष असलेल्या 'अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम' (AMMK) ने टीव्हीकेवर टीका करत त्यांच्यावर घोडेबाजाराचा आरोप केला आहे. या राजकीय घडामोडींमुळे तमिळनाडूमध्ये पुन्हा एकदा "रिसॉर्ट पॉलिटिक्स" सुरू झाले असून २०१६ मध्ये माजी मुख्यमंत्री जे. जयललिता यांच्या निधनानंतर असा प्रकार पाहायला मिळाला होता. टीव्हीकेला पाठिंबा देणाऱ्या काँग्रेसच्या पाच आमदारांना हैदराबादला हलवण्यात आले आहे, तर टीव्हीकेच्या आमदारांना चेन्नईजवळील महाबलीपुरम येथील रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, व्हीसीके उपमुख्यमंत्रीपदासह काही महत्त्वाची पदे मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे, मात्र कोणत्याही पक्षाने अद्याप अधिकृतपणे याला दुजोरा दिलेला नाही. दरम्यान, राज्यातील सत्तासंघर्षामुळे तमिळनाडूच्या राजकारणात मोठी अनिश्चितता निर्माण झाली असून पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत.

### विजय जोसेफ यांना १२० आमदारांचं पाठबळ

तमिळनाडूमध्ये २३४ सदस्यीय विधानसभेत सत्तास्थापनेसाठी ११८ संख्याबळाची आवश्यकता आहे. टीव्हीकेला १०८ जागा मिळाल्या असून दोन जागांवरून स्वतः विजय जोसेफ निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांनी एक मतदारसंघ सोडला असून टीव्हीकेकडे सध्या १०७ सदस्य संख्या आहे. त्यामुळे त्यांना ११ आमदारांच्या पाठबळाची आवश्यकता आहे. अखेर, विदुतलै चिरुतैगल कच्ची (VCK), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) (CPI-M) आणि काँग्रेस या पक्षांनी पाठिंबा दिला असून १२० आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांना सुपूर्द केलं आहे.

### किती आमदारांचं पाठबळ?

| | |
|---|---|
| तमिळगा वेत्री कझगम (TVK) : | १०७ |
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC) : | ५ |
| कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (CPI) : | २ |
| सीपीआय (एम)(CPI) : | २ |
| विदुथलाई चिरूथईगल काची (VCK) : | २ |
| इंडियन युनियन मुस्लिम लीग (IUML) | २ |

# ‘हरित हायड्रोजन’ क्षेत्रातील अग्रदूत, डॉ. रवी पंडित

## आघारकर संशोधन संस्थांच्या माध्यमातून इंधन घटनिर्मिती, हरित हायड्रोजन निर्मितीला चालना

महाईन्यूज । पुणे

**तंत्रज्ञान, वाहन क्षेत्रातील मोठे नाव असलेले ‘केपीआयटी’चे सहसंस्थापक डॉ. रवी पंडित यांनी पुण्यातूनच हरित हायड्रोजन, हायड्रोजनवर चालणारी वाहने तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल), आघारकर संशोधन संस्थांच्या माध्यमातून त्यांनी इंधन घटनिर्मिती, हरित हायड्रोजन निर्मितीला चालना दिली.**




राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. आशिष लेले म्हणाले, ‘२००९-१०च्या सुमारास डॉ. रवी पंडित यांच्याशी संपर्क आला. त्या वेळी आम्ही राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत इंधनघट (फ्युएल सेल) निर्मितीवर काम करत होतो. या संदर्भात त्यांनी माझ्याशी संपर्क साधून ‘केपीआयटी’ला या कामी रस असल्याचे सांगून एकत्र काय करता येईल, असे विचारले. त्यांनी संपर्क साधल्याने खूप आश्चर्य वाटले. एकतर केपीआयटी ही मला माहिती तंत्रज्ञान कंपनी असल्याचे वाटले होते. तसेच, भारतातील एक खासगी उद्योग स्वत:हून तंत्रज्ञान निर्मितीमध्ये रस घेत असल्याचे पाहून कौतुक वाटले. त्यानंतर २०११मध्ये आमच्या बैठका झाल्या. त्या वेळी आम्ही एकत्रितपणे इंधनघट विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी खूप चांगल्या अभियंत्यांचा चमू आणला.

आमचे शास्त्रज्ञ आणि त्यांचे अभियंते असे मिळून खूप उत्तम पद्धतीने इंधनघट विकसित केला. या कामी त्यांचा सातत्याने पाठिंबा होता.’ ‘डॉ. पंडित सनदी लेखापाल असले, तरी त्यांच्याकडे अभियंत्याची दृष्टी होती. आमच्या आढावा बैठकांमध्ये ते उत्साहाने सहभागी व्हायचे. अतिशय महत्त्वाचे प्रश्न विचारायचे. तांत्रिक माहिती जाणून घेण्याची, आत्मसात करण्याची त्यांची क्षमता कमालीची होती. त्यांच्यासोबत केलेल्या कामातून खूप चांगले इंधनघट तंत्रज्ञान विकसित झाले. त्यांनी ते इंधनघट काही वाहनांमध्ये बसवून चाचणी घेतली. त्यात सुरुवातीला चारचाकी, बस आणि नंतर छोटी बोट (कॅटॅबरान) या इंधनघटावर चालविण्यात आली. ती छोटी बोट आता वाराणसी येथे कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे हायड्रोजन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात डॉ. पंडित यांचे फार मोठे योगदान आहे. माहिती तंत्रज्ञान कंपनीचे त्यांनी ऑटोमोटिव्ह कंपनीमध्ये केलेले रूपांतर फार मोठे आहे. त्यांनी नवोन्मेषाला चालना दिली. भारतामध्ये ‘डीप टेक’मध्ये काम करणारी, त्यासाठी पैसा ओतणारी माणसे दुर्मीळ आहेत,’ असे डॉ. लेले यांनी सांगितले. आघारकर संशोधन संस्थेच्या साहाय्याने डॉ. पंडित हायड्रोजन निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण काम करत होते. त्या संदर्भात आघारकर संशोधन संस्थेचे संचालक डॉ. ढाकेफाळकर म्हणाले, ‘डॉ. रवी पंडित यांनी हरित हायड्रोजन क्षेत्रातील अग्रदूत म्हणून ‘नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन’मध्ये मोलाचे योगदान दिले.

### ‘प्रकल्प प्रत्यक्षात यायला हवा’

‘भारतासाठी कृषी कचऱ्यापासून हायड्रोजन निर्मिती हे खूप चांगले तंत्रज्ञान असल्याचे त्यांच्या लक्षात आले होते. त्या दृष्टीने त्यांनी आघारकर संस्थेसह काम सुरू केले होते. कुठे कुठे हायड्रोजन निर्मिती करता येईल याची संपूर्ण योजना तयार करून त्यांनी नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशनमध्ये त्याचे सादरीकरण केले. त्याचे खूप कौतुक झाले होते. आता तो प्रकल्प किमान प्रायोगिक तत्त्वावर तरी प्रत्यक्षात यावा अशी इच्छा आहे,’ अशी भावना डॉ. आशिष लेले यांनी व्यक्त केली.

# राज्यातील अकरावी प्रवेशाच्या पहिली फेरीचे प्रवेश २१ ते २८ मे दरम्यान

महाईन्यूज । पुणे

**राज्य मंडळाने दहावीचा निकाल जाहीर केल्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ८ ते २० मे दरम्यान शून्य फेरी, तर २१ ते २८ मे दरम्यान पहिल्या फेरीतील प्रवेश राबवण्यात येणार आहेत.**



माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. दहावीची परीक्षा संपल्यानंतर अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठीची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यानुसार आतापर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरला आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग दोन भरता येणार आहे. इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला केवळ ऑनलाइन पद्धतीनेच प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

शिक्षण विभागातर्फे अकरावी प्रवेशाची शून्य फेरी सुरू करण्यात आली आहे. त्यात विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरता येणार आहे. तसेच ११ मे ते १३ मे या कालावधीत प्रवेश अर्जाचा भाग एक आणि भाग दोन भरू शकतात. व्यवस्थापन, अल्पसंख्यांक, संस्थांतर्गत कोट्याबाबत माहिती भरू शकतात. महाविद्यालयांच्या पसंतिक्रमांमध्ये किमान एक ते कमाल दहा महाविद्यालयांचे पसंतिक्रम नोंदवू शकतात. तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी १४ ते १५ मे दरम्यान प्रसिद्ध केली जाणार आहे. या यादीवर १६ मे रोजी विद्यार्थ्यांना हरकती नोंदवता येतील. २० मे रोजी पहिल्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित केल्या जाणार आहेत.

### शून्य फेरी संपल्यानंतर नियमित पहिली फेरी

शून्य फेरी संपल्यानंतर २१ ते २८ मे दरम्यान नियमित पहिली फेरी राबविण्यात येणार आहे. त्यानुसार २१ ते २२ मे रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना भाग एक भरणे, अर्जाचा भाग दोन भरणे ही प्रक्रिया करता येणार आहे. २३ ते २६ मे दरम्यान विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे प्रवेश जाहीर करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. २६ ते २८ मे दरम्यान विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये जाऊन प्रत्यक्ष प्रवेश घेता येणार आहे. २९ मे रोजी दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा जाहीर करण्यात येतील. तसेच ३० मे रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. महेश पालकर यांनी दिली. दरम्यान, प्रवेश प्रक्रियेतील कोणतीही अडचण टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मालमत्ता कर विभागांची पुनर्रचना

## २०२६-२७ पासून नवीन बांधकामांना लागू होणार नवीन ‘अ’ व ‘ब’ विभाग रचना

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनी व मालमत्तांवरील कर आकारणी अधिक प्रभावी करण्यासाठी प्रशासनाने ‘विभाग अ’, ‘विभाग ब’ आणि ‘विभाग क’ या विभागांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली असून, अंतिम मंजुरीसाठी हा विषय महापालिका सभेकडे शिफारस करण्यात आला आहे.**




दि. ५ मे रोजी झालेल्या महापालिका सर्वसाधारण सभेत या विषावरुन मोठा गदारोळ झाला होता. विशिष्ट भागावर कर आकारणीमध्ये दुजाभाव नको. आधी सुविधा द्या मग कर वाढ करा... अशी भूमिका सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांनीही घेतला होता.

महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीने शहरात झालेला झपाट्याने विकास, नव्याने समाविष्ट भाग, निवासी व व्यावसायिक बांधकामांची वाढ तसेच वापरातील बदल लक्षात घेऊन ही पुनर्रचना करण्यात येत आहे. सन २०२६-२७ पासून नव्याने उभारण्यात येणाऱ्या निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र वापराच्या इमारती तसेच बांधकाम व वापर बदल प्रकरणांवर नवीन विभाग रचना लागू होणार आहे.

नवीन प्रस्तावानुसार निगडी प्राधिकरण, आकुर्डी, थेरगाव, सांगवी, पिंपरी वाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन, फुगेवाडी-दापोडी, भोसरी, चऱ्होली, मोशी, चिखली, वाकड, कस्पटे वस्ती या विभागीय कार्यालयांतील सर्व समाविष्ट गटांचा ‘अ’ विभागात समावेश करण्यात येणार आहे. तसेच किवळे विभागीय कार्यालयातील गट क्रमांक ०४ (रावेत) याचाही ‘अ’ विभागात समावेश असेल.

### गट क्रमांक १ व २ यांचा ‘ब’ विभागात समावेश

तळवडे व दिघी-बोपखेल विभागीय कार्यालयांतील सर्व समाविष्ट गट तसेच विके विभागातील उर्वरित गट क्रमांक १ व २ यांचा ‘ब’ विभागात समावेश करण्यात येणार आहे. झोपडपट्टी भागांसाठी स्वतंत्र सेवा आकार वसुलीची व्यवस्था कायम ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. स्थायी समितीतील सदस्य मा. बाबासाहेब त्रिभुवन व मा. योगिता नागरगोजे यांनी यासंदर्भातील प्रस्ताव मांडला आहे.

# धर्मकार्यात कोणत्या लवांडेनी लडबूड करु नये : आमदार महेश लांडगे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**हिंदू धर्माच्या प्रचार, प्रसारासाठी काम करणाऱ्या प्रबोधरकार, कीर्तनकार आणि संतांचा आदर ठेवलाच पाहिजे. विकास लवांडे यांच्याबाबत ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांनी केलेल्या शाईफेकीचे आम्ही जाहीर समर्थन करतो, असे भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.**







“वारकरी सांप्रदायातील २० घुसखोर” अशी टीका करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी जाहीरपणे केली होती. त्यामुळे हिंदुत्ववादी संस्था, संघटनांमधून निषेध व्यक्त होत होता. दरम्यान, ह.भ.प. संग्रामबापू भंडारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आळंदी येथे लवांडे यांच्यावर शाईफेक केली.

आमदार लांडगे म्हणाले की, ह.भ.प. संग्रामबापू हे सुरुवातीपासूनच धर्मनिष्ठ असून हिंदू धर्माचा प्रचार-प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहेत. "वारकरी संप्रदायातील आदरणीय महाराज मंडळींबद्दल लवांडे यांनी वापरलेले शब्द अत्यंत चुकीचे होते. समाजातील अशा प्रवृत्तींविरुद्ध लोकांमध्ये संताप असणे स्वाभाविक आहे. ज्या २० व्यक्तींच्या संदर्भात लवांडे यांनी वक्तव्य केले आहे, त्यांचे सामाजिक कार्य त्यांनी आधी पाहावे. हे महाराज समाजातील वंचित घटकांसाठी अविरत काम करत आहेत. वैचारिक मतभेद की पातळी? हा राजकीय वाद नसून वैचारिक मतभेदाचा विषय आहे.

तसेच, लवांडे यांच्यासारखी मंडळी स्वतःला विद्वान समजून समाजात विष कालवण्याचे आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. वारकरी संप्रदाय आणि धार्मिक परंपरांवरील टीका समाज सहन करणार नाही, इशाराही आमदार लांडगे यांनी दिला आहे.

> “ आपण प्रवक्ते म्हणून हुशार असाल, पण वारकरी संप्रदायातील दिग्गजांवर बोलण्याइतकी कोणाचीच उंची नाही. भले तरी देऊ कासेची लंगोटी नाठाळाचे माथी हाणू काठी” अशी शिकवण जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांनी दिली आहे. समाजाला दिशा देण्यासाठी प्रसंगी कठोर पावले उचलणे गैर नाही. त्यामुळे ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांचे जाहीर समर्थक करतो.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



## भूमिका

**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपच्या ऐतिहासिक विजयानंतर भाजपने महाराष्ट्रात निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेवर भर दिला आहे. शिवाय दलीत मतदारांमध्ये वाद असलेल्या उपजातीय वर्गीकरणाच्या मुद्याचे बिगुल वाजले आहेच.**

# भाजपचे बंगाल मॉडेल आता महाराष्ट्रात



साडे अकरा टक्के मुस्लिम आणि बारा टक्के दलीत-अनुसूचित जातीचे मतदार महाविकास आघाडीची शक्ती आहेत. त्यांच्यात या विधानसभेला भाजपने खिंडार पाडले होतेच. आता नव्या मोहिमेची तयारी आहे. त्याचा इफेक्ट आणि साइड इफेक्ट काय होतो याची खूप उत्सुकता असेल.

नुकतेच दादरच्या वसंतस्मृती कार्यालयात भाजपने कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली. यात एसआयआरच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला. नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या. प्रशिक्षणानंतर लोकप्रतिनिधी, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार आणि मंत्र्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षित केले जाईल. अंतिम टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्गदर्शन करतील. देशभरात एसआयआरवर मोठे वादळ उठले आहे. विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगावर भाजपला मदत करण्याचे आरोप केले आहेत. पश्चिम बंगालमध्ये सुमारे 91 लाख मतदारांची नावे वगळण्यात आली, ज्यामुळे भाजपच्या अनेक जागी निकटच्या विजयात त्याची भूमिका असल्याचे विश्लेषण आहे. उत्तर प्रदेशात 2 कोटींहून अधिक नावे काढली गेली. विरोधकांनी या मोहिमेद्वारे मुस्लिम, महिलांसह दुर्बल घटकांना लक्ष्य केल्याचा दावा केला. निवडणूक आयोगाने मात्र ही प्रक्रिया स्वच्छ मतदार यादीसाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. भाजपनेही तोच कित्ता गिरवला आहे. त्यामुळे याचा महाराष्ट्रात भविष्यात मोठा गवगवा होणार हे निश्चित. पण केवळ मुस्लिम मतांकडे बोट दाखवले जात असले तरी उपवर्गीकरणाच्या मुद्यावरून दलीत मतांमध्येही फूट पडण्याची चिन्हे आहेत ज्याकडे भाजप बारीक लक्ष ठेवून आहे. महाराष्ट्रात मुस्लिम लोकसंख्या सुमारे 11.54 टक्के आहे, जी सुमारे 1.3 कोटींच्या घरात आहे. गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये (2014, 2019, 2024) मुस्लिम मतदार मुख्यत: महाविकास आघाडी (काँग्रेस-राष्ट्रवादी- ठाकरे शिवसेना) कडे झुकले. 2024 मध्ये मुस्लिम मतांचे विभाजन झाल्याने महायुतीला 38 मुस्लिम प्रभावित जागांवर फायदा झाला. मुस्लिम बहुसंख्य 50 टक्केहून अधिक मतदार असलेल्या जागा जसे मालेगाव, भिवंडी पूर्व, शिवाजी नगर येथे मात्र महायुतीला पराभव स्वीकारावा लागला. मतदानाची टक्केवारी मुस्लिम प्रभावित जागांवर राज्य सरासरीपेक्षा कमी राहिली. एमआयएम सारख्या पक्षांनी काही जागा काढल्या. विधानसभा आणि लोकसभेला संभाजी नगर हातचे जाणे ठाकरे शिवसेनेसाठी मोठा फटका होते तिथे हिंदू आणि संभाव्य मुस्लिम मतदार दोन्हीकडून ठाकरे सेना अडचणीत आली.

## प्रासंगिक »

### अन्न, मन आणि पचन

**मन आणि पचनसंस्था यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. मानसिक ताण, राग, नैराश्य, मत्सर किंवा भीती यांचा थेट परिणाम पचनक्रियेवर होतो.**

हरिण आणि सिंहाच्या उदाहरणातून हे स्पष्ट होते की संकटाच्या क्षणी शरीर स्वतःचे संरक्षण करण्यासाठी पचन थांबवते आणि संपूर्ण ऊर्जा जीव वाचवण्यासाठी वापरते. आजच्या धावपळीच्या जीवनातही माणूस तणाव, अपयश आणि नातेसंबंधातील संघर्षामुळे अशाच अवस्थेतून जातो. अशावेळी भूक कमी होणे, अन्न न पचणे किंवा आरोग्य बिघडणे सामान्य आहे. त्यामुळे तणाव कमी करण्यासाठी व्यायाम, फेरफटका, सकारात्मक विचार आणि ध्यानधारणा आवश्यक ठरतात. कौटुंबिक जीवनात प्रेम, शांतता आणि त्याग यामुळे मानसिक स्थैर्य निर्माण होते. तसेच, अपयश स्वीकारून पुढे जाण्याची वृत्ती विकसित करणे महत्त्वाचे आहे. आयुर्वेदानुसार सात्त्विक आहार आणि जीवनशैली मन शुद्ध, शांत आणि संतुलित ठेवतात.

तात्पर्य - निरोगी शरीरासाठी शांत मन आणि संतुलित आहार हे दोन्ही तितकेच आवश्यक आहेत.

भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशासाठी मान्सून हा केवळ ऋतू नसून अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. देशातील सुमारे 60 ते 65 टक्के लोकसंख्या आजही शेतीवर अवलंबून आहे आणि या शेतीचे संपूर्ण गणित पावसावरच अवलंबून असते.

# सुपर एल निनोचे सावट; मान्सूनसमोर नवे आव्हान



त्यामुळे मान्सूनचे आगमन, त्याचा वेग, कालावधी आणि एकूण पर्जन्यमान याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले असते. यंदा मान्सून निर्धारित वेळेत अंदमान-निकोबार बेटांवर दाखल होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने दिलासादायक वातावरण निर्माण झाले आहे. सर्वसाधारणपणे 18 ते 19 मेदरम्यान मान्सून या बेटांवर सक्रिय होतो. त्यानंतर केरळमध्ये 1 जूनच्या आसपास त्याचे आगमन होते आणि पुढे गोवा, कर्नाटक, महाराष्ट्राकडे त्याची वाटचाल सुरू होते.

शेतीच्या दृष्टीने जूनपेक्षा जुलै महिना अधिक महत्त्वाचा मानला जातो. कारण पेरण्या, पिकांची वाढ आणि पाण्याची उपलब्धता या काळात ठरते. मात्र यंदा हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केलेली 'सुपर एल निनो'ची शक्यता चिंता वाढवणारी आहे. प्रशांत महासागरातील पाण्याचे तापमान वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला एल निनो म्हणतात. या प्रक्रियेमुळे भारतीय उपखंडाकडे येणारे नैऋत्य मोसमी वारे कमकुवत होतात आणि पावसाचे प्रमाण घटते. यंदा निर्माण होणारा एल निनो अधिक तीव्र असण्याची शक्यता असल्याने त्याला 'सुपर एल निनो' असे संबोधले जात आहे.

1950 नंतर आतापर्यंत 27 वेळा एल निनो निर्माण झाला असून त्यातील पाच वेळा परिस्थिती अत्यंत गंभीर ठरली आहे. 2015-16 मधील सुपर एल निनोमुळे अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. तसेच 2023-24 मध्येही एल निनोचा प्रभाव जाणवला होता. त्यामुळे यंदाच्या मान्सूनकडे अधिक सावधपणे पाहण्याची गरज आहे. हवामान विभागाने जून ते सप्टेंबरदरम्यान सरासरीच्या 92 टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. ही तूट भरून काढण्यासाठी जलव्यवस्थापन, पाणी साठवण आणि काटकसरीने वापर यावर भर द्यावा लागणार आहे. मागील वर्षी देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला, तरी अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे यंदा सुपर एल निनोचा प्रभाव वाढल्यास पाणीबाणीचे संकट अधिक गंभीर होऊ शकते. शेती, उद्योग, पिण्याचे पाणी आणि देशाची अर्थव्यवस्था या सर्वांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसाचा आगमनसोहळा आनंद देणारा असला तरी यंदाच्या मान्सूनला चिंतेची किनार लाभलेली दिसते

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥धृ.॥॥ - संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठी प्रायोगिक परीक्षेत धक्कादायक वास्तव!

## मीरा-भाईंदरमध्ये राबवलेल्या प्रायोगिक मोहिमेत १५ टक्के चालकांना मराठीचे ज्ञानच नाही

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्रातील ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधावा, यासाठी राज्य सरकारच्या परिवहन विभागाने मोहीम हाती घेतली होती. मराठीत संभाषण न करणाऱ्या रिक्षा, टॅक्सी चालकांचे परवाने १ मे पासून रद्द करण्यात येतील, असे सांगण्यात आले होते. मात्र चालक संघटना आणि काही पक्षांच्या प्रतिनिधींनी यात हस्तक्षेप करत विरोध दर्शविल्यानंतर या मोहिमेसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान ऑटो चालकांना मराठी भाषेचे ज्ञान किती आहे, हे तपासण्यासाठी एक प्रायोगिक मोहीम राबवली गेली होती. त्यात अनेक रिक्षाचालकांना मराठी भाषेची ओळख नसल्याचे समोर आले आहे.**



### सरकारकडून यापूर्वीही मराठी भाषा अनिवार्य करण्याचा प्रयत्न

राज्य सरकारने फेब्रुवारी २०१६ मध्येही अशाच प्रकारे मराठी भाषा अनिवार्य करण्याचे प्रयत्न केले होते. चालकांना परवाना देताना त्यांना मराठी भाषेतील प्राविण्य तपासण्याचे निर्देश राज्य परिवहन आयुक्तांनी आरटीओंना दिले होते. मात्र भिवंडी शहर रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेसह इतर संघटनांनी याला विरोध करत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परवाने मिळवण्यासाठी मराठी भाषेतील प्राविण्य अनिवार्य करणे बेकायदेशीर असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला. त्यानंतर पुन्हा मराठी भाषेबद्दल राज्यव्यापी मोहीम राबवली गेली नाही.

२ एप्रिल ते १ मे दरम्यान मीरा-भाईंदर परिसरात हा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यात आला होता. या परिसरात आरटीओकडे नोंदणी असलेले १२,००० ऑटोरिक्षा आहेत. द इंडियन एक्सप्रेसने यासंदर्भात माहिती घेतली असता ३,७६० रिक्षाचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५८७ जणांना मराठीचे व्यावहारिक ज्ञान असल्याचे सिद्ध करता आले नाही.

आता १ मे पासून ते १५ ऑगस्ट या कालावधीत ही मोहीम महाराष्ट्रातील सर्व ५९ आरटीओंमध्ये राबवली जाणार आहे. मोहीम संपल्यानंतर सर्व आरटीओ आपल्या पडताळणीचा डेटा राज्य परिवहन विभागाकडे सुपूर्द करतील.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या विधानसभा मतदारसंघात मीरा-भाईंदरचा काही परिसर येतो. या मोहिमेबाबत द इंडियन एक्सप्रेसला माहिती देताना ते म्हणाले, ऑटो चालकांच्या उपजीविकेला धोका निर्माण करण्याचा आमचा कोणताही उद्देश नाही. मात्र प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे, हे जाणून घेण्यासाठी ही प्रायोगिक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत आढळले की, अनेक रिक्षा चालकांना अतिशय साधे मराठीही बोलता येत नाही. तर अनेकांनी मराठी शिकण्याची तयारी दर्शवली.

या माहिमेचा उद्देश कोणाच्याही उपजीविकेला लक्ष्य करणे अजिबात नाही. तर महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाहतूक क्षेत्राशी संबंधित असलेले चालक प्रवाशांशी मराठीत संवाद साधू शकतील आणि नियमांचे पालन करतील, हे सुनिश्चित करणे होते, असेही ते म्हणाले.

२०१९ मधील सुधारित महाराष्ट्र मोटार वाहन नियमावलीतील नियम २४ ची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या वतीने ही राज्यव्यापी मोहीम राबविण्यात आली. या नियमानुसार सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील चालकांना मराठीचे व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. या नियमानुसार, ऑटो किंवा टॅक्सी चालविण्यासाठी धातूचा बिल्ला मिळवण्यासाठी अर्जदारांना त्यांच्या कार्यरत क्षेत्रातील स्थानिक मार्गांचे पुरेसे ज्ञान, तसेच मराठी आणि सामान्यतः बोलल्या जाणाऱ्या आणखी एका भाषेचे व्यावहारिक ज्ञान असल्याचे सिद्ध करावे लागेल.

१४ एप्रिल पूर्वी राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार, १ मे पासून सर्व परवानाधारक ऑटो आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेतील प्रावीण्य सिद्ध करावे लागणार होते. मराठी बोलता न येणाऱ्या चालकांचे परवाने रद्द होऊ शकतात, अशी भीती पसरल्यामुळे वाहतूक संघटनांनी यावर आक्षेप घेतला. यानंतर सरकारने नरमाईची भूमिका घेत १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषेतील प्राविण्याच्या आधारावर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, असे जाहीर केले.

# रवींद्रनाथ टागोरांच्या पत्राच्या आडून ओवेसी यांनी केला 'वंदे मातरम' ला विरोध

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**

**गुरु रवींद्रनाथ टागोर यांनी सुभाषचंद्र बोस यांना लिहिलेल्या पत्राचा आधार घेत 'वंदे मातरम' ला राष्ट्रीय गीत करण्यास एमआयएमचे अध्यक्ष असदोद्दीन ओवेसी यांनी विरोध केला. हे गीत दूर्गा देवीचे वर्णन असून त्यास मुस्लीम विरोध करतील असा टागोरांनी बोस यांना लिहिलेल्या पत्रातील मजकूर त्यांनी छत्रपती संभाजीनगरच्या पत्रकार बैठकीत वाचून दाखवला.**



वंदे मातरम् वर आपण संसदेमध्येही भूमिका मांडल्याचे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

'वंदे मातरम्' वर मत ऐकायचे आहे ना, मग आता ऐकून घ्यावे लागेल. असे म्हणत त्यांनी या वर भाष्य केले. माझे मत कदाचित तुम्हाला आवडणार नाही. पण लक्षात घ्या असे म्हणत त्यांनी रवींद्रनाथ टागोर यांनी सुभाषचंद्र बोस यांना या अनुषंगाने लिहिलेल्या पत्रातील तिसरा परिच्छेद त्यांनी वाचून दाखवला. ते म्हणाले, वंदे मातरम् दशभूजाधारी दूर्गाचे वर्णन आहे. त्यामुळे बंगालमधील मुस्लिम हे गीत स्वीकारणार नाहीत. असे पत्रात नमूद आहे. जन – गण – मन हे राष्ट्रीय गीत आहेच. ते बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेतील उद्देशिकेशी जोडलेले आहे.

संसदेत विविध धर्माचे लोक प्रतिनिधी निवडले जातात. ते विविधतेचे प्रतिनिधीत्व करते. त्यामुळे वंदे मातरम् हे गीत अस्थानी ठरेल असे टागोरांनी म्हटले होते. जी भूमिका टागोरांची होती तीच आमची होती. सुभाषचंद्र बोस आणि रवींद्रनाथ टागोर यांची देशभक्ती ही पंतप्रधानापेक्षा आणि माझ्यापेक्षा जास्तच होती. त्यामुळे ती भूमिका आमची असल्याचे ओवसी म्हणाले.

वंदे मातरम् हे गीत ज्या 'आनंदमठ' कादंबरीमध्ये लिहिले गेले आहे त्या पुस्तकात अनेक मुस्लिम विरोधी वाक्य आहेत. ही वाक्ये आजही वाचून दाखवली तरी आवडणार नाहीत. पण तेव्हाचे गीत आता लागू करताना रवींद्रनाथ टागोर यांचे हे पत्र आणि कादंबरीतील ती वाक्येही आवर्जून वाचावेत. हवे असेल तर तो मजकूर पाठविण्याची व्यवस्थाही करतो, असे ओवेसी पत्रकार बैठकीत म्हणाले.

वंदे मातरम हे गीत राष्ट्रगीत करण्याच्या हालचाली सुरू आहेत. संसंदेमध्ये सुरू असणाऱ्या पार्श्वभूमीवर ओवेसी यांनी वंदे मातरम् गीतास विरोध करण्यासाठी टागोरांच्या पत्राचा आधार घेतला आहे. त्या मजकुराच्या आडून वंदे मातरम गीतास राष्ट्रगीत करण्यास विरोध दर्शवला आहे. टागोरांचे हे पत्र कोणत्या पुस्तकातून घेतले आहे हेही ओवेसी यांनी सांगितले. बंकिमचंद्र चटर्जी यांनी आनंदमठ पुस्तकात इंग्रजांचे गुणगान केले असल्याचेही ओवेसी म्हणाले. मी हे वाचून दाखवले तर तुमच्या अधिक पोटात दुखेल असेही ओवेसी म्हणाले. जन गण मन हे भारत साजरे करतो. उद्देशिका तयार करतानाही त्यात वंदे मातरम वापरावे अशी चर्चा झाली होती. पण तेव्हाच्या नेत्यांची देशभक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रा. स्व. संघापेक्षा अधिक होती. देवाच्या नावाच्या असेही लिहिण्याचे ठरवले जात होते. पण भारत हा कोणत्याही एका धर्माला मानणाऱ्यांचा नाही. तो सर्व धर्मियांचा आहे आणि अगदी नास्तिकांचाही आहे. हेच तुमच्या वंदे मातरम वरच्या प्रश्नाचे उत्तर आहे, असे ओवेसी म्हणाले.

# भाजपा आमचा पहिला शत्रू; ममता बॅनर्जी

## सुवेंदू अधिकारींच्या शपथविधीनंतर ममता बॅनर्जींची टीका; विरोधी ऐक्याची हाक

**महाईन्यूज ।**
**पश्चिम बंगाल**

**तृणमूल काँग्रेसच्या (TMC) प्रमुख ममता बॅनर्जी यांनी शनिवारी पश्चिम बंगालमधील सर्व विरोधी पक्षांना भाजपाविरुद्ध लढण्यासाठी एका संयुक्त व्यासपीठावर येण्याचे आवाहन केले. १५ वर्षांच्या सत्ताकाळानंतर ममता बॅनर्जी यांच्याकडून भाजपाने राज्याची सूत्रे हाती घेतली आहेत. माजी मुख्यमंत्र्यांनी भाजपला विरोध करणाऱ्या विद्यार्थी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनाही भाजपविरोधात एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.**



विशेष म्हणजे, सुवेंदू अधिकारी यांनी बंगालचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि भाजपाचे पहिले मुख्यमंत्री बनले, त्याच पार्श्वभूमीवर ममता यांचा हा संदेश आला आहे.

ममता यांनी राष्ट्रीय पक्षांनाही त्यांच्या संयुक्त व्यासपीठात सामील होण्याचे आवाहन केले. त्या पुढे म्हणाल्या की, जर कोणत्याही राजकीय पक्षाला या संदर्भात चर्चा करायची असेल तर त्या चर्चेसाठी तयार आहेत. "शत्रूचा शत्रू आपला मित्र असा विचार करण्याची ही वेळ नाही, भाजपा हा आपला पहिला शत्रू आहे", असं टीएमसी नेत्या म्हणाल्या.

बंगालमधील टीएमसीच्या पराभवानंतर इंडिया (INDIA) आघाडीबाबतच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. भाजपाच्या मोठ्या विजयानंतर दुसऱ्याच दिवशी विरोधी आघाडीचे नेते अखिलेश यादव यांनी ममतांची भेट घेतली आणि निवडणूक आयोग व भाजपाने बंगालमधील जनादेश चोरला असल्याच्या त्यांच्या दाव्याला पाठिंबा दिला. ममता 'इंडिया' आघाडीचा भाग असल्या तरी, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष बंगालमध्ये स्वतंत्रपणे लढला होता.

दरम्यान, राहुल गांधी यांनीही सोशल मीडियावर एक छोटा व्हिडिओ पोस्ट करून विरोधी आघाडीबाबत मोठा दावा केला. "लिहून घ्या," असे म्हणत राहुल गांधींनी शुक्रवारी आपल्या 'एक्स' पोस्टमध्ये म्हटले की, "भाजपा आणि नरेंद्र मोदींना इतर कोणताही पक्ष हरवू शकत नाही. केवळ काँग्रेसच हे करू शकते. विरोधी आघाडीला तामिळनाडूमध्येही धक्का बसला आहे

### भाजपाविरोधात एकत्र या

विधानसभा निवडणुकीत ममतांच्या पक्षाचा मोठा पराभव झाला असून, ४ मे रोजी भाजपाने दोन तृतीयांश बहुमत मिळवले आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंतीनिमित्त आपल्या कालीघाट येथील निवासस्थानासमोर एका छोट्या सभेला संबोधित करताना बॅनर्जी म्हणाल्या, "मी डाव्या आणि अति-डाव्यांसह सर्व विरोधी पक्षांना भाजपाविरुद्ध संयुक्त व्यासपीठ तयार करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन करते."

---

## एकाच क्षेपणास्त्राने शत्रूचे अनेक तळ उद्ध्वस्त होणार; 'अग्नी'ची MIRV तंत्रज्ञानासह चाचणी यशस्वी

**महाईन्यूज । अमेरिका**

**भारताने संरक्षण क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत ८ मे रोजी ओडिशातील डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेट येथून प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी पार पाडली. या चाचणीचे वैशिष्ट्य म्हणजे या क्षेपणास्त्रामध्ये 'मल्टिपल इंडिपेंडंटली टार्गेटेबल री-एन्ट्री व्हेईकल' (MIRV) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे एकाच क्षेपणास्त्रातून अनेक वेगवेगळ्या लक्ष्यांवर स्वतंत्रपणे अचूक प्रहार करता येतो. त्यामुळे युद्धाच्या परिस्थितीत शत्रूचे अनेक तळ, लष्करी ठिकाणे किंवा सामरिक केंद्रे एकाच वेळी उद्ध्वस्त करण्याची क्षमता भारताला प्राप्त झाली आहे.**



या चाचणीदरम्यान क्षेपणास्त्रातून एकापेक्षा अधिक 'पेलोड्स' डागण्यात आले. हे पेलोड्स हिंदी महासागर क्षेत्रातील मोठ्या भौगोलिक परिसरात विखुरलेल्या वेगवेगळ्या लक्ष्यांवर अचूकपणे पोहोचले. क्षेपणास्त्राच्या उड्डाणाचा संपूर्ण मार्ग जमिनीवरील तसेच समुद्रातील जहाजांवरील आधुनिक ट्रॅकिंग यंत्रणांद्वारे बारकाईने पाहण्यात आला. 'टेलिमेट्री' आणि 'ट्रॅकिंग' प्रणालीच्या मदतीने प्रक्षेपणापासून लक्ष्यावर आदळेपर्यंतचा प्रत्येक टप्पा यशस्वीरित्या नोंदवण्यात आला.

उड्डाणानंतर मिळालेल्या सर्व तांत्रिक माहितीनुसार या चाचणीची सर्व उद्दिष्टे पूर्णपणे यशस्वी ठरल्याची पुष्टी करण्यात आली. या यशामुळे भारताची दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्र प्रणालीतील ताकद अधिक मजबूत झाली असून, एकाच वेळी अनेक सामरिक लक्ष्यांवर अचूक हल्ला करण्याची क्षमता जगासमोर पुन्हा सिद्ध झाली आहे. विशेष म्हणजे MIRV तंत्रज्ञान हे अत्यंत प्रगत आणि मर्यादित देशांकडेच असलेले तंत्रज्ञान मानले जाते. त्यामुळे या यशामुळे भारताची संरक्षण क्षमता आणि जागतिक सामरिक स्थान अधिक भक्कम झाले आहे. या यशस्वी चाचणीमुळे भारताने संरक्षण क्षेत्रात तांत्रिकदृष्ट्या अत्यंत प्रगत राष्ट्रांच्या यादीत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. भविष्यातील युद्धनीतीमध्ये अशा अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणाली भारतासाठी मोठा सामरिक फायदा ठरणार आहेत.

### स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित ही यशस्वी चाचणी

या क्षेपणास्त्राची निर्मिती संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO) च्या विविध प्रयोगशाळांनी देशभरातील उद्योगांच्या सहकार्याने केली आहे. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित ही यशस्वी चाचणी 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमालाही मोठे बळ देणारी मानली जात आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशाबद्दल DRDO, भारतीय सैन्य दल आणि संबंधित उद्योगांचे अभिनंदन केले. वाढत्या जागतिक सुरक्षाविषयक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही चाचणी भारताच्या संरक्षण सज्जतेत मोठी भर घालणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# लग्नाचं स्वप्न दाखवलं अन् ९ कोटी लुबाडले

सिनेसृष्टीतून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. ‘बिग बॉस तेलुगू’ फेम अभिनेत्री आशू रेड्डी हिने एका एनआरआय सॉफ्टवेअर इंजिनिअरला लग्नाचे आमिष दाखवून ९.३५ कोटी रुपयांना गंडा घातल्याचा खळबळजनक आरोप झाला आहे. याप्रकरणी हैदराबादमधील सेंट्रल क्राईम स्टेशनमध्ये अभिनेत्रीविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली आहे. लंडनमध्ये कार्यरत असलेल्या वाय. व्ही. धर्मेंद्र या तरुणाचे वडील सत्यनारायण यांनी ही तक्रार दाखल केली आहे. प्राप्त माहितीनुसार, २०१८ मध्ये धर्मेंद्र भारतात आला असताना त्याची ओळख आशूशी झाली होती. अभिनेत्रीने त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढून लग्नाचे वचन दिले आणि त्यानंतर विविध कारणांसाठी त्याच्याकडून मोठी रक्कम उकळण्यास सुरुवात केली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, आशूने धर्मेंद्रला तिच्यासाठी महागड्या कार, फ्लॅट्स आणि सुमारे ५ किलो सोने खरेदी करण्यास भाग पाडले. धक्कादायक बाब म्हणजे, ही सर्व मालमत्ता तिने स्वतःच्या नावावर नोंदवून घेतली आहे. सुरुवातीला अभिनेत्रीच्या कुटुंबाने या लग्नाला पाठिंबा दर्शवत धर्मेंद्रचा विश्वास संपादन केला, मात्र नंतर त्यांनी या लग्नास नकार दिला. धर्मेंद्रच्या वडिलांच्या दाव्यानुसार, २०२५ पर्यंत त्यांच्या मुलाने रोख रक्कम, दागिने आणि मालमत्तेच्या स्वरूपात अभिनेत्रीला दिले आहेत. या फसवणुकीत अभिनेत्रीच्या कुटुंबातील सदस्यांचाही सहभाग असल्याचा दावा करण्यात आला आहे. सत्यनारायण यांच्या तक्रारीवरून सीसीएस पोलिसांनी आता या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे. गेल्या काही दिवसांत सेलिब्रिटींशी संबंधित फसवणुकीचे हे दुसरे मोठे प्रकरण समोर आले आहे. काही काळापूर्वीच प्रसिद्ध गायिका मांगली हिच्यावरही १० कोटींच्या फसवणुकीचे आरोप झाले होते. आशू रेड्डी ही ‘बिग बॉस तेलुगू’ या रिॲलिटी शोमुळे चर्चेत आली होती. सोशल मीडियावर तिचा मोठा चाहता वर्ग असून ती सतत सक्रिय असते. यापूर्वी चित्रपट दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्यासोबतच्या एका वादग्रस्त मुलाखतीमुळे ती प्रकाशझोतात आली होती. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या या गंभीर आरोपांवर आणि पोलीस तक्रारीवर आशू रेड्डीने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.





# ‘बोल्ड सीन’वर असाही संताप

या वर्षात येणाऱ्या बहुचर्चित चित्रपटांपैकी एक म्हणजे ‘टॉक्सिक : अ फेरी टेल फॉर ग्रोन अप्स.’ गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूड अभिनेत्री कियारा अडवाणीने तिच्या या आगामी चित्रपटामधील अभिनेता यश सोबतची इंटीमेट दृश्य हटवण्याची मागणी केल्याच्या चर्चा होत्या. अखेर तिने यावर संतापजनक प्रतिक्रिया देत या सर्व चर्चा बकवास असल्याचे म्हटले आहे. बोल्ड सीन हटवण्याच्या चर्चांवर कियारा भडकलेल्या कियाराने ‘ॲबसोल्यूट नॉनसेन्स’ या दोन शब्दांतच विषय संपवला, स्क्रिनशॉट टाकत म्हणाली. कियाराने मीडिया रिपोर्ट्सला फेटाळून लावत एक स्क्रीनशॉट शेअर केलाय. यामध्ये टॉक्सिक चित्रपटातील बोल्ड दृश्य हटवण्याच्या चर्चेवर तिनं मौन सोडलक आहे. तिने या सगळ्या चर्चा पूर्णपणे निरर्थक असल्याचं म्हटले आहे. सुरुवातीला हा चित्रपट ४ जूनला रिलीज होणार होता. मात्र आता तो पुढे ढकलण्यात आला आहे. अद्याप या चित्रपटाची नवीन रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली नाही. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाची रिलीज डेट वारंवार पुढे ढकलले जात होती. त्यामुळे कियाराचे चाहते निराश झाले होते. वैयक्तिक आयुष्यात बाळाला जन्म दिल्यानंतरचा तिचा हा पहिला प्रोजेक्ट आहे. त्यामुळेही या चित्रपटाची चर्चा रंगली आहे. दरम्यान या चित्रपटातील अभिनेता यश सोबतचे सर्व इन्टिमेट आणि बोर्ड रोमँटिक सीन पसंत न पडल्यामुळे तिने ते काढून टाकण्याची मागणी मेकर्स कडे केल्याचं म्हटलं जात होतं. या सगळ्या चर्चांवर कियारा अडवाणीने दोन शब्दात विषय संपवला आहे. तिने बोल्ड शूट हटवण्याबाबतच्या चर्चा निरर्थक असल्याचे म्हटले. ‘टॉक्सिक’ चित्रपटाच्या टिझरमधील एका बोल्ड सीनवर यापूर्वीही सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला होता. एका कारमधील इंटीमेट सीनवरून कियाराला ट्रोल केले जात होते. कियाराने यशसोबत एक बोल्ड रोमँटिक सीन शूट केला होता. दिग्दर्शकांनी तो सीन तिच्या कम्फर्ट झोनमध्ये राहून शूट केला जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र फायनल आउटपूट पाहिल्यानंतर कियारा या सीनबाबत पुन्हा विचार करत असल्याची चर्चा होती. ‘टॉक्सिक’ या चित्रपटाचे दिग्दर्शन गीतू मोहनदास यांनी केले आहे. तर यश हा चित्रपटाचा निर्माता देखील आहे. याशिवाय यश नितेश तिवारी याच्या आगामी ‘रामायण’ चित्रपटातील रावणाच्या भूमिकेचीही चर्चा आहे.

# जैस्वालला NADAकडून नोटीस

## शफाली वर्मालाही बजावली नोटीस

**महाईन्यूज | मुंबई**


**आयपीएल २०२६ चा थरार सध्या जोरात सुरू आहे. पण या सगळ्या घडामोडींच्या दरम्यान, अनेक वादही निर्माण होताना दिसत आहेत. पण आता एक मोठा वाद आता भारतीय क्रिकेटमधून समोर आला असून, तो पहिल्यांदाच उघड झाला आहे. आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या युवा भारतीय सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि युवा महिला संघाची सलामीवीर शफाली वर्मा या दोघांना डोप चाचणीत संबंधित नोटीस बजावण्यात आली आहे.**





एका रिपोर्टनुसार, भारतीय क्रिकेटचे हे दोन्ही स्टार खेळाडू डोप चाचणीसाठी उपलब्ध नव्हते, त्यामुळे बीसीसीआय आणि आयसीसीकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या रिपोर्टनुसार, राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेने (नाडा) चाचणीसाठी अनुपलब्ध असल्याबद्दल डिसेंबरमध्ये दोन्ही खेळाडूंना नोटीस बजावली होती. शेफाली आणि यशस्वी या नाडाच्या नोंदणीकृत चाचणी गटात (RTP) समाविष्ट असलेल्या काही भारतीय क्रिकेटपटूंपैकी आहेत.

या गटात समाविष्ट असलेल्या सर्व खेळाडूंना दरवर्षी त्यांची ठिकाणे आणि वेळा आगाऊ माहिती देत कळवणं बंधनकारक आहे आणि तसे न केल्यास त्यांना नोटीस बजावली जाते. हे 'व्हेयरअबाउट क्लॉज'चे उल्लंघन मानले जाते. याच नियमाचं यशस्वी व शेफाली यांनी उल्लंघन केलं आहे.'




# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरण्यात विनेश फोगटला अडथळा

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**निवृत्तीचा निर्णय मागे घेत तब्बल २० महिन्यांनी कुस्तीच्या मॅटवर पुनरागमन करणार्या विनेश फोगटचे आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न अधुरेच राहणार आहे. भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) आपल्या निवड चाचणीतच बदल केल्यामुळे विनेश आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळू शकणार नाही. शिवाय २३ वर्षांखालील गटातील कुस्तीगिरांनाही चाचणीत भाग घेणे अवघड जाणार आहे.**



'डब्ल्यूएफआय'ने १० ते १२ मे दरम्यान गोंडा येथे राष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेतील पदकविजेत्यांचा आशियाई पात्रता स्पर्धेसाठी विचार केला जाणार होता. मात्र, आता 'डब्ल्यूएफआय'ने आशियाई स्पर्धेसाठी पात्रता निकषातच बदल केल्यामुळे या स्पर्धेच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी प्रवास, निवास, भोजन असा सर्व खर्च सहभागी मल्लांनाच करायचा आहे. महासंघाने केवळ या सर्व संलग्न संघटनांना तेथील उपलब्ध धर्मशाळांच्या नावांची यादी पाठवली आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार सर्व मल्लांना नोंदणी प्रक्रिया पूर्ण करायची असल्याचे समजते.

पॅरिस ऑलिम्पिकनंतर विनेशने निवृत्ती घेतली होती. मात्र, आशियाई क्रीडा स्पर्धा आणि ऑलिम्पिक स्पर्धा डोळ्यासमोर ठेवून तिने पुनरागमनाचा निर्णय घेतला. संयुक्त आंतरराष्ट्रीय महासंघ आणि 'डब्ल्यूएफआय' यांच्या नियमानुसार वेळेत निवृत्ती मागे घेण्याची प्रक्रिया विनेशकडून पार पाडण्यात आली. त्यानंतर अनेक प्रयासानंतर मानांकन स्पर्धेसाठी विनेशचे नाव नोंदवले गेले.

उत्तेजक सेवन प्रतिबंध संस्थेची प्रक्रिया देखील विनेशने पार पाडली. तिचा मानांकन स्पर्धेत खेळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, निकषच बदलल्यामुळे विनेश आता आशियाई स्पर्धेत खेळू शकणार नाही. परंतु ती पुन्हा एकदा जागतिक स्पर्धेचे ध्येय बाळगू शकते.

> आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवडीसाठी गोंडा येथे राष्ट्रीय मानांकन स्पर्धेतील कामगिरी ग्राह्य धरली जाणार नाही. परंतु मानांकन स्पर्धेतील पदकविजेत्यांचा आगामी जागतिक आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी विचार केला जाईल.
>
> – 'डब्ल्यूएफआय' अधिकारी.

### २३ वर्षांखालील गटाची अडचण

आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीची निवड चाचणी ३० आणि ३१ मे रोजी होणार आहे. मात्र, २३ वर्षांखालील गटातील मल्लांना या चाचणीत खेळणे अवघड जाऊ शकते. व्हिएतनाम येथे नियोजित २३ वर्षांखालील आशियाई स्पर्धा २६ तारखेस संपणार आहे. त्यानंतर चारच दिवसांत भारतात येऊन चाचणीत सहभागी होणे युवा मल्लांसाठी आव्हानात्मक ठरेल. महासंघाने जे मल्ल २३ वर्षांखालील स्पर्धेतून माघार घेतील, त्यांना आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी प्रवेश मिळणार नाही अशी सक्तीची अट घातली आहे.

### निकषात काय बदल?

गोंडा येथील राष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धेतील पदकविजेत्यांचा आशियाई पात्रता स्पर्धेसाठी विचार केला जाणार होता. मात्र, आता पात्रता निकष बदलण्यात आला आहे. बदलत्या निकषानुसार, आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवडी चाचणीसाठी आता वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा (१२ ते १४ डिसेंबर २०२५), वरिष्ठ फेडरेशन स्पर्धा (१२ ते १४ फेब्रुवारी २०२६) आणि २० वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धा (१० ते १२ एप्रिल २०२६) यातील पदकविजेत्यांनाच पात्र धरले जाईल. विनेश यापैकी एकाही स्पर्धेत सहभागी झाली नाही. त्यामुळेच विनेश आशियाई स्पर्धेत खेळू शकणार नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। रविवार ।
दि. 10 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# महापालिका अधिकाऱ्यांच्या खासगी वाहनांसाठी उधळपट्टी?

## खाजगी वाहन वापर भत्त्यात थेट ५० हजारांपर्यंत वाढ प्रस्तावित

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत पदाधिकारी आणि वाहन देय अधिकाऱ्यांच्या खासगी वाहन वापरासाठी दिल्या जाणाऱ्या प्रतिपूर्ती रकमेत मोठी वाढ करण्याचा प्रस्ताव समोर आला असून, यावरून आर्थिक उधळपट्टीचा आरोप होत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या वाहन वाटप धोरणानुसार अधिकाऱ्यांना महापालिकेचे वाहन न वापरता स्वतःचे वाहन शासकीय कामासाठी वापरण्याची मुभा देण्यात आली होती. त्यासाठी २०१७ मध्ये प्रतिमहिना निश्चित रक्कम मंजूर करण्यात आली होती.**



त्या वेळी पेट्रोल वाहनांसाठी प्रतिमहिना ३९ हजार ५६० रुपये, तर डिझेल वाहनांसाठी ३६ हजार ५६० रुपये इतकी प्रतिपूर्ती निश्चित करण्यात आली होती. मात्र आता २०२६ मध्ये वाहनांच्या किंमती, इंधन दर, देखभाल खर्च आणि चालक वेतन वाढल्याचे कारण देत ही रक्कम थेट ५० हजार रुपये प्रतिमहिना करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीतून पुढे आला आहे.

या प्रस्तावामुळे महापालिकेच्या तिजोरीवर कोट्यवधींचा अतिरिक्त भार पडणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. शहरात मूलभूत सुविधांचे अनेक प्रश्न प्रलंबित असताना अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या वाहन खर्चासाठी इतकी मोठी वाढ करणे योग्य आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, अनेक विभागांमध्ये खर्च कपातीचे आदेश असताना वाहन भत्त्यातील ही वाढ विरोधाभासी असल्याचे मत व्यक्त होत आहे. पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, आरोग्य सेवा आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत कामांसाठी निधी अपुरा पडत असताना अधिकाऱ्यांच्या सुविधांवर लाखो रुपये खर्च करण्यास प्राधान्य दिले जात असल्याची टीका होत आहे.

### नागरिकांच्या पैशावर ऐशोआराम..!

विरोधकांनीही या प्रस्तावावर आक्षेप घेत "महापालिकेच्या पैशांवर अधिकाऱ्यांची ऐशआराम व्यवस्था सुरू आहे का?" असा सवाल उपस्थित केला आहे. सामान्य नागरिकांना करवाढीचा बोजा आणि अधिकाऱ्यांना वाढीव वाहन भत्ता, अशी परिस्थिती निर्माण झाल्याची प्रतिक्रिया काही सामाजिक संघटनांनी दिली आहे. दरम्यान, हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महापालिका सभेपुढे ठेवण्यात येणार असून, सभेत यावर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

# पाणी समस्या भरमसाठ; प्रशासनाचा ठेकेदारीला मुदतवाढीचा घाट!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील नागरिक पाणीटंचाई, कमी दाबाचा पुरवठा, गळती आणि दूषित पाण्याच्या समस्यांनी हैराण असताना महापालिका प्रशासनाने मात्र पाणीपुरवठा परिचालनाच्या ठेकेदारांना पुन्हा मुदतवाढ देण्याचा घाट घातला आहे. कामात सातत्याने त्रुटी, नागरिकांच्या तक्रारी आणि नियोजनाचा पूर्ण बोजवारा उडाल्यानंतरही त्याच ठेकेदारांना पुन्हा संधी देण्यात येत असल्याने संताप व्यक्त होत आहे.**

अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या जलक्षेत्र परिचालन व देखभाल दुरुस्तीच्या कामांची मुदत मूळतः मार्च २०२५ पर्यंत होती. मात्र नवीन निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरले. त्यानंतर सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, पुढे मार्च २०२६ पर्यंत वाढ करण्यात आली आणि आता आणखी तीन महिन्यांची वाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती व महापालिका सभेपुढे आणण्यात आला आहे.

शहरातील वस्तुस्थिती मात्र प्रशासनाच्या दाव्यांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. अनेक भागांत नागरिकांना दोन-दोन दिवस पाणी मिळत नाही, तर काही भागांत गढूळ पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. पाइपलाइन फुटी आणि गळती दुरुस्तीचे काम दिवसन्‌दिवस रखडत असल्याने लाखो लिटर पाणी वाया जात आहे. तरीही या सर्व अपयशावर पांघरूण घालत प्रशासन ठेकेदारांना संरक्षण देत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

"पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी मुदतवाढ आवश्यक" असा दावा प्रशासनाकडून करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात ही मुदतवाढ म्हणजे ठेकेदारांना दिलेले आर्थिक 'ऑक्सिजन' असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे. नवीन निविदा प्रक्रिया वेळेत राबवण्यात झालेल्या निष्काळजीपणाची किंमत आता नागरिकांना मोजावी लागत असून, त्याच वेळी ठेकेदारांवर मात्र कृपावृष्टी सुरू असल्याचे चित्र आहे.

सुधारित खर्चालाही स्थायी समितीकडून मंजुरी घेण्यात येणार असून, त्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी विषय महापालिका सभेकडे जाणार आहे. पाणी समस्येने त्रस्त शहराला उपाययोजना देण्याऐवजी प्रशासन 'मुदतवाढीच्या राजकारणा'त गुंतल्याची जोरदार टीका आता पुढे येऊ लागली आहे.




### पाणी नाही, पण ठेकेदारांना मात्र मुदतवाढ का?

दि. ५ मे रोजी झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पाणीपुरवठ्याच्या मुद्द्यावर प्रचंड गदारोळ झाला होता. शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा, वारंवार होणाऱ्या तक्रारी, गळती आणि नियोजनाच्या बोजवाऱ्यावर नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले होते. अशा परिस्थितीत पाणीपुरवठ्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी वारंवार मुदतवाढ दिली जात असल्याने संशय अधिक गडद होत आहे. "नवीन निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण होत नाही आणि त्याच ठेकेदारांना पुन्हा पुन्हा संधी दिली जाते, यामागे ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची मिलिभगत तर नाही ना?" असा थेट सवाल आता पिंपरी-चिंचवडकरांमधून उपस्थित केला जात आहे. शहरातील नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असताना, प्रशासन मात्र ठेकेदारांना संरक्षण देण्यात व्यस्त असल्याची भावना तीव्र होत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनीही या विषयावर आक्रमक भूमिका घ्यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत ‘नगरसचिव कराराधिष्ठित’ पदासाठी उल्हास जगताप यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव

## प्रस्तावाला मंजुरीची प्रतीक्षा : महापालिका नगरविकास विभागाचे कामकाज होणार सुरळीत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सभा शाखेचे कामकाज अधिक कार्यक्षम, सुरळीत व वेळेत पार पाडण्यासाठी ‘नगरसचिव कराराधिष्ठित’ या पदावर अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भातील जाहिरात महापालिकेकडून २५ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.**



महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या १० जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही प्रक्रिया राबविण्यात आली असून, पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. या जाहिरातीच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सेवानिवृत्त अतिरिक्त आयुक्त श्री. उल्हास बबनराव जगताप यांनी २७ एप्रिल २०२६ रोजी अर्ज सादर केला होता.

महापालिका प्रशासनाने त्यांच्या अर्जासह सादर केलेल्या कागदपत्रांची तपशीलवार छाननी केली असता, जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अर्हता व निकषांची पूर्तता होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच सभा विषयक आणि प्रशासकीय कामकाजाचा त्यांना व्यापक अनुभव असल्याने सभा शाखेचे काम प्रभावीपणे हाताळण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, हे पद पूर्णपणे करार पद्धतीवरील आणि विशिष्ट कामकाजापुरते मर्यादित असणार आहे. नियुक्त अधिकाऱ्यास कोणतेही प्रशासकीय किंवा वित्तीय अधिकार देण्यात येणार नसून, या नियुक्तीमुळे नियमित सेवेत समावेशाचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे श्री. उल्हास बबनराव जगताप यांची ‘नगरसचिव कराराधिष्ठित’ पदावर एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पद्धतीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्याबाबत महापालिकेच्या स्तरावर विचार सुरू आहे.

### विद्यमान नगर सचिव मुकेश कोळप यांना दणका

महापालिका सर्वसाधारण सभेचे कामकाज अचूक होण्याबाबत नगरसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने अत्यंत काळजीपूर्वक काम करणे आवश्यक आहे. मात्र, पदोन्नतीने नगरसचिव झालेल्या कोळप यांना या विभागाचे कामकाज हातळणे जिकीरीचे झाले आहे. दि. २० एप्रिल रोजी तहकूब झालेल्या सर्वसाधारण सभेत नगरसचिव यांनी महापौर रवी लांडगे यांनी विषय वाचण्यासाठी दिला. त्यावेळी अर्थसंकल्प संदर्भातील विषय मंजूर आणि बाकी सभा तहकूब अशी माहिती देण्यात आली. त्यामुळे विरोधकांनी महापौर आणि सत्ताधारी पक्षावर टीका केली. तसेच, प्रसारमाध्यमांमध्येही त्याचे पडसाद उमटले होते. वास्तविक, नगरसचिवांनी जो विषय दिला तो मी वाचला, ती चूक नगरसचिवांची आहे, असे जाहीरपण सांगितले होते. त्याचाच फटका मुकेश कोळप यांना बसला आहे. त्यांना दिशा देण्यासाठी उल्हास जगताप यांना रुज करुन घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे सूत्रांनी सांगितले.

# डीवायपीआययू आणि डसॉल्ट सिस्टिम्स यांच्यात अनुभव केंद्र स्थापनेसाठी सामंजस्य करार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ (DYPIU) ने आपल्या कॅम्पसमध्ये अत्याधुनिक डिजिटल इंजिनिअरिंग आणि डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग अनुभव केंद्र स्थापन करण्यासाठी डसॉल्ट सिस्टिम्स सोबत सामंजस्य करार (MOU) केला आहे. या उपक्रमाचा उद्देश उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील सहकार्य अधिक बळकट करणे तसेच बदलत्या औद्योगिक गरजांनुसार विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करणे हा आहे.**




डसॉल्ट सिस्टिम्सच्या सहकार्याने विकसित होणारे हे अनुभव केंद्र DYPIU च्या स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग अभ्यासक्रमात अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश करेल. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील पिढीतील अभियांत्रिकी आणि उत्पादन प्रक्रियेबाबत सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवही मिळणार आहे. महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या पहिल्या उपक्रमांपैकी हा एक असून, उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्माण करण्यासोबतच प्रगत उत्पादन क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्याचा यामागील उद्देश आहे.

या केंद्रात नेक्स्टजन प्रॉडक्ट इनोव्हेशन लॅब, इंटेलिजंट प्रॉडक्शन सिस्टम लॅब आणि व्हर्च्युअल ट्विन व सिम्युलेशन लॅब अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतील. विद्यार्थ्यांना व्हर्च्युअल ट्विन्स, जनरेटिव्ह डिझाइन, मल्टी-फिजिक्स सिम्युलेशन आणि डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग सिस्टिम्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव घेता येईल.

या सहकार्यांतर्गत विद्यार्थ्यांना लाईव्ह प्रोजेक्ट्स, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, इंटर्नशिप्स आणि उद्योग तज्ज्ञांशी संवाद यांचा लाभ मिळणार आहे. तसेच प्राध्यापक विकास आणि अभ्यासक्रम उन्नतीसाठीही हे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरणार असून जागतिक औद्योगिक मानकांशी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करण्यात मदत होणार आहे. याशिवाय, प्रगत डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रियांमध्ये प्राध्यापकांना प्रावीण्य मिळावे यासाठी तीन वर्षांचा “ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स” (TOT) कार्यक्रम राबविण्याचीही योजना आहे.

“DYPIU सोबत अनुभव केंद्र स्थापनेचे हे सहकार्य शैक्षणिक शिक्षण आणि प्रत्यक्ष औद्योगिक उपयोग यांतील दरी कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. 3DEXPERIENCE प्लॅटफॉर्म आणि व्हर्च्युअल ट्विन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ‘मेक इन इंडिया’ आणि इंडस्ट्री 4.0 च्या गरजांशी सुसंगत नवोन्मेषक परिसंस्था निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे,” असे डसॉल्ट सिस्टिम्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक दीपक एनजी यांनी सांगितले.

DYPIU चे कुलगुरू प्रा. (डॉ.) मनीष भल्ला म्हणाले, “हे सहकार्य DYPIU च्या प्रगतीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. डसॉल्ट सिस्टिम्सच्या सहकार्याने DYPIU मध्ये स्थापन होणारे हे अनुभव केंद्र महाराष्ट्रातील स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील अशा प्रकारच्या पहिल्या केंद्रांपैकी एक असेल. यामुळे अनुभवाधारित शिक्षणाची मजबूत परिसंस्था निर्माण होईल, जिथे विद्यार्थी प्रत्यक्ष औद्योगिक समस्यांवर काम करत प्रभावी तंत्रज्ञान हस्तांतरण प्रक्रियेत सहभागी होतील. हा उपक्रम आमच्या विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना नवोन्मेष करण्यास, अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबत कार्य करण्यास आणि खऱ्या अर्थाने भविष्याभिमुख अभियंते म्हणून विकसित होण्यास सक्षम करेल.

### डसॉल्ट सिस्टिम्स विषयी

DASSAULT SYSTÈMES ही मानवी प्रगतीला गती देणारी जागतिक तंत्रज्ञान कंपनी आहे. 1981 पासून कंपनीने ग्राहक, रुग्ण आणि नागरिकांचे जीवन अधिक चांगले करण्यासाठी आभासी जगाच्या संकल्पनेत अग्रणी भूमिका बजावली आहे. 3DEXPERIENCE प्लॅटफॉर्मद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित आणि विज्ञानाधारित व्हर्च्युअल ट्विन तंत्रज्ञानाचा वापर करून विविध उद्योगांतील 3,90,000 हून अधिक ग्राहकांना सहकार्य, कल्पनाशक्ती आणि शाश्वत नवकल्पना निर्माण करण्यास मदत केली जाते.

अधिक माहितीसाठी भेट द्या: WWW.3DS.COM

# स्व. अजित पवार लीडरशिप कॉन्टेस्ट २०२५-२६ उत्साहात

## शिक्षण विश्व : आकुर्डीतील श्री म्हाळसाकांत विद्यालयात 'लीडरशिप फेअर'

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळ आणि सोलओंकार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच स्वर्गीय अजित पवार लीडरशिप कॉन्टेस्ट २०२५-२६ चे आयोजन आकुर्डी येथील श्री म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडले. ही स्पर्धा 'लीडरशिप फेअर' या संकल्पनेअंतर्गत घेण्यात आली होती.**




या स्पर्धेत शहर व ग्रामीण विभागातून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला. एकूण ३२ शाळांमधून प्राथमिक फेरी घेण्यात आली असून अंतिम फेरीत ८१ विद्यार्थी व १६ शिक्षकांनी सहभाग घेतला. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होण्यास मदत झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

शहरी विभागात हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला, तर ग्रामीण विभागात कामशेत येथील पंडित नेहरू विद्यालयाने प्रथम स्थान मिळवले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. ज्योती गोगटे, संस्थेचे मानद सचिव ॲड. संदीप कदम, सहाय्यक सचिव आत्माराम जाधव, डॉ. अमित देवकुळे आणि प्राचार्य भानुदास मालुसरे आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण डॉ. ज्योती गोगटे आणि डॉ. अमित देवकुळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रतीक्षा वाघमारे यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. ज्योती गोगटे आणि डॉ. अमित देवकुळे यांनी केले.

> या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून नेतृत्व गुण विकसित होऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधला जाईल.विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि संघभावना वाढवण्यासाठी स्वर्गीय अजितदादांच्या नावाने ही स्पर्धा सुरू करण्यात आली आहे.
>
> – ॲड. संदीप कदम, मानद सचिव.

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

शहर विभाग- प्रथम : अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, द्वितीय : शारदाबाई पवार इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूल, खराडी, तृतीय : युआॅन सेकंडरी स्कूल, खराडी, ग्रामीण विभाग- प्रथम : पंडित नेहरू विद्यालय, कामशेत, द्वितीय : पिरंगुट इंग्लिश स्कूल, पिरंगुट, तृतीय : श्री शिवाजी विद्यालय, शेल पिंपळगाव, उत्तेजनार्थ : श्री शिवाजी विद्यालय, देहूरोड. शिक्षक गट- संध्याराणी आटोळे, सुरेखा गुळवे, शैली मिश्रा, दत्तात्रेय पोवार, ज्योती तरटे, राजश्री बेल्हेकर आणि मीनाक्षी नरके यांना गौरविण्यात आले.

# थेरगावच्या 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल'चा दहावीचा निकाल १०० टक्के

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**येथील नामांकित शैक्षणिक संस्था 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल'*ने यंदाही आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालात शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, विशेष म्हणजे परीक्षेस बसलेले सर्व ८९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.**




यावर्षीच्या परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. परीक्षेत सार्थक झोरे याने ९२.६०% गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला, तर आकांक्षा बंदीचोडे आणि सृष्टी मांजरे या दोघींनी ९२.४०% गुण मिळवून संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच महारुफ खान ९१.८०% गुण मिळवून यशस्वी ठरला आहे.

न्यू इंग्लिश मीडियम स्कूल हे केवळ अभ्यासासाठीच नव्हे, तर शिस्त, क्रीडा आणि विद्यार्थ्यांवरील उत्तम संस्कारांसाठी थेरगाव परिसरात ओळखले जाते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार, सचिव श्री. अशोक मोरे, खजिनदार सौ. सुरेखा पवार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले आहे. मुख्याध्यापिका सौ. विद्या नाईक व इग्रिस मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे फळ असल्याचे व्यवस्थापनाने नमूद केले.

शाळेच्या या यशामुळे पालकांचा ओढा वाढत असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्ले-ग्रुप ते दहावी पर्यंतची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. थेरगाव, रहाटणी, काळेवाडी आणि वाकड परिसरातील पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन शाळेतर्फे करण्यात आले आहे.

### निकालाची वैशिष्ट्ये:

- ९०% हून अधिक गुण: १० विद्यार्थी
- विशेष प्राविण्य (DISTINCTION): ४३ विद्यार्थी
- प्रथम श्रेणी: ३१ विद्यार्थी
- द्वितीय श्रेणी: १५ विद्यार्थी



> आमच्या शाळेने १००% निकालाची परंपरा कायम राखली, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. हे यश म्हणजे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. आम्ही केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देतो.
>
> – विजय पवार, संस्थापक अध्यक्ष.